मसुदा

क्र. ८/२०१५-१६

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार, ***मंगळवार, दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता*** वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय व्ही. देशमुख, (कुलगुरू)

२. श्री. सिध्दार्थ खरात

३. श्री. शैलेद्र देवळणकर

४. डॉ. अनिल पाटील, (संचालक, बी.सी.यु.डी.)

श्री. अ.आ. फळणीकर, वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, परीक्षा नियंत्रक हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

➢ **श्रध्दांजली –**

**श्री. आशा पाटील**

जेष्ठ अभिनेत्री आशा पाटील यांचे दिर्घ आजाराने दिनांक १८ जानेवारी २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**डॉ. अरूण टिकेकर**

जेष्ठ विचारवंत, समाजसंस्कृती व इतिहासाचे भाष्यकार आणि लोकसत्ता चे माजी संपादक डॉ. अरूण टिकेकर यांचे ह्यदयविकाराच्या तीव्र धक्याने दिनांक १८ जानेवारी २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते.

**डॉ. दौलतराव आहेर**

भाजपाचे ज्येष्ठ नेते व राज्याचे माजी आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर यांचे अलपशा आजाराने दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षांचे होते.

**श्री. राम प्रधान**

मुंबई सकाळचे माजी सहसंपादक श्री. राम प्रधान यांचे अल्पशा आजाराने दिनांक २० जानेवारी २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

**श्रीमती मृणालिनी साराभाई**

भारतातील प्रसिध्द नृत्यांगना आणि पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित श्रीमती मृणालिनी साराभाई यांचे दिर्घ आजाराने दिनांक २१ जानेवारी २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षांचे होते.

**डॉ. द.भि. कुलकर्णी**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि प्रतिभावंत समीक्षक प्रा. डॉ. द.भि. कुलकर्णी यांचे दिर्घ आजाराने दिनांक २७ जानेवारी २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षांचे होते.

**श्रीमती. अरूणा भट**

ज्येष्ठ नाटयक्रर्मी श्रीमती अरूणा भट यांचे अल्पशा आजाराने दिनांक २७जानेवारी २०१६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६५ वर्षांचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात येते

बाब १: दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

ठराव असा ठराव करण्यात आला की, दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्य इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

बाब २: **मे, २०१५ मध्ये घेतलेल्या T.Y.B.A. (Sem_V) (CBSGS) (75:25) या परीक्षेच्या निकाल पत्रकात (office ledger) व गुणपत्रकात निदर्शनास आलेली त्रुटी संदर्भात परीक्षा मंडळाने घेतलेल्या निर्णय अनुमतीसाठी व पुढील कार्यवाही सुचविण्यासाठी.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, **मे, २०१५ मध्ये घेतलेल्या T.Y.B.A. (Sem-V) (CBSGS) (75:25) या परीक्षेच्या निकाल पत्रकात (office ledger) व गुणपत्रकात निदर्शनास आलेली त्रुटी संदर्भात परीक्षा मंडळाने घेतलेल्या निर्णय मान्य करण्यात आला.**

**पुढे असाही ठराव करण्यात आला की, श्री. सुभाष नवाले यांना निलंबीत करून त्यांच्यावर चौकशी समिती नेमून चौकशी त्वरित सुरू करावी व शक्यतो समितीने तीन महिन्याच्या आत रिपोर्ट सादर करावा व सदर रिपोर्ट पुन्हा व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ सादर करावा.**

Item3: Launching of B.Sc Aviation and Commercial Pilot Courses at Garware Institute of Carrier Education : MOU of Flying Club for Approval.

Resolution: *Resolved* that the . Launching of B.Sc Aviation and Commercial Pilot Courses at Garware Institute of Carrier Education : MOU of Flying Club च्या खालील बाबींची पुर्तता करून पुन्हा व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्याच्या अटीवर तत्वता मान्यता देण्यात येत आहे.
१ – कोर्स मागणीच्या एक सर्वे करून रिपोर्ट सादर करावा.
२ – गरवारे ॲडवायजरी कमिटीचा त्यांनी दायित्व घेण्याचा ठराव सादर करावा.
३– लिगल ॲडवायझर कडून MOU तपासून त्याचा रिपोर्ट सादर करावा.

बाब४: दिनांक ७ मे, २०१५ रोजी संपन्न झालेल्या तक्रार निवारण समितीपुढे १४ प्रस्तावांवरील ठरावास मान्यता मिळणेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, दिनांक ७ मे, २०१५ रोजी संपन्न झालेल्या तक्रार निवारण समितीपुढे १४ प्रस्तावांवरील ठरावास मान्यता देण्यात आली.

बाब५: दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी संपन्न झालेल्या तक्रार निवारण समितीपुढे २ प्रस्तावांवरील ठरावास मान्यता मिळणेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी संपन्न झालेल्या तक्रार निवारण समितीपुढे २ प्रस्तावांवरील ठरावास मान्यता देण्यात आली.

बाब ६: फेब्रवारी/मार्च–२०१७ मध्ये होणा–या १० महानगरपालिका निवडणूकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याबाबत उपाययोजना करणे...

ठराव: असा ठराव करण्यात आला की, फेब्रवारी/मार्च–२०१७ मध्ये होणा–या १० महानगरपालिका निवडणूकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्याबाबत उपाययोजना करण्यास मान्यता देण्यात आली.

---

मान्यतेसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| कुलगुरू | कुलसचिव | 10-9-2016<br>संचालक<br>(बी.सी.यु.डी.) | 10/9/16<br>उपकुलसचिव<br>(प्राधिकरणे) |